सायं.दैनिक
# विश्वनायक
Email : vishvanayak94@gmail.com
• संपादक : बिलाल शेख •
Mo-9422404740



गेवराई तालुक्यातील दोन्ही राष्ट्रीय महामार्ग सोलापूर धुळे व कल्याण विशाखापट्टणम संबंधित अडचणी,सुचना, तक्रारी बाबत गेवराई तालुक्यातील सामाजिक, राजकीय, नागरिक यांची बैठक रविवार दि १५ जुन रोजी सकाळी ११ वा परिवर्तन गड मा संजय भाऊ काळे यांच्या जुन्या बसस्टँड जवळील संपर्क कार्यालयात आयोजित केली आहे तरी या विषयी ज्यांना आपल्या अडचणी मांडावयाच्या आहेत त्यांनी लेखी स्वरूपात घेवून याव्यात ही विनंती, सदरील बैठक ड. संजयभाऊ काळे अध्यक्ष राष्ट्रीय महामार्ग समिती गेवराई यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. श्यामराव गायकवाड पाटील कैलासराव माने, ॲड. राहुल कुमार राका, विलास खिसाडे, शिरीष भोसले यांनी केले आहे

बीड (महाराष्ट्र) | दैनिक | द्विभाषिक | वर्ष ०२ अंक - १५५ शुक्रवार, दि.१३ जुन २०२५ | आरएनआय -एमएएचबीआयएल १०५४८ | किंमत २ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily | BILINGUAL | Year 02 Issue - 155 Friday, Dt.13 June 2025 | TC : MAHBIL10548 | PRICE - 2 RUPEES | PAGES - 4

# बोगस गुंठेवारीचा मलिदा खाणाऱ्या चांडाळाची आता खैर नाही !

## पुराव्यासह तक्रार करूनही कारवाई न झाल्याने तक्रारदार आता थेट हायकोर्टात

## बोगस गुंठेवारी करून घेणारे अन करून देणारे सगळेच अडकणार

**विश्वनायक न्यूज**

बीड नगरपालिके अंतर्गत करण्यात आलेल्या बोगस गुंठेवारीतील सगळेच चांडाळ आता अडकणार आहेत. प्रशासनाकडे पुराव्यासह तक्रार दाखल करूनही कारवाई होत नसल्याने तक्रारदार हे आता थेट हायकोर्टात गेले आहेत. यामुळे बोगस गुंठेवारी करून घेणारे आणि करून देणारे हे सगळेच कारवाईच्या गोत्यात येणार आहेत. आता त्यांची खैर होणार नाही.

बीड नगरपालिके अंतर्गत असलेल्या काही सर्वे नंबर मध्ये नगरपालिकेच्या मालकीच्या जागेची बोगस गुंठेवारी करून ती खाजगी व्यक्तीच्या नावावर करण्याचा अत्यंत गंभीर प्रकार झाला आहे. हे करून देताना यामध्ये लाखोंचा व्यवहार झाल्याचे सांगण्यात येते. या बोगस गुंठेवारी मध्ये नगरपालिकेतील काही अधिकारी - कर्मचारी सहभागी असून खाजगी व्यक्तींनी ही जागा आपल्या नावावर करून घेतली आहे. तक्रारदार यांनी याबाबतची माहिती गोळा केली असता, यामध्ये प्रचंड मोठा घपला झाला असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार तक्रारदाराने संपूर्ण पुरावे जमा करीत नगरपालिका मुख्याधिकारी यांच्यासह नगर विकास विभाग, जिल्हाधिकारी, उपायुक्त यांच्याकडे पुराव्यासह तक्रार दाखल केली. जिल्हा प्रशासनाकडे तक्रार दाखल झाल्यानंतर या प्रकरणाची चौकशी होणे अपेक्षित होते. मात्र दोन महिने झाले तरी प्रशासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्याने, तक्रारदाराने आता थेट हायकोर्टाची दरवाजे ठोठावली आहेत. या संदर्भात याचिका दाखल करण्यात आली असून, यामध्ये जिल्हा प्रशासन आणि नगरपालिका प्रशासन

यांना जाब विचारण्यासोबतच संबंधितावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यामुळे या बोगस गुंठेवारीचा मलिदा खाणारे सगळेच चांडाळ यांच्यावर कारवाई होणार आहे. ज्यांनी बोगस गुंठेवारी करून घेतली आणि ज्यांनी ती करून दिली या सगळ्याच बांडगुळावर कारवाई होणार आहे.

कोणाच्या कार्यकाळात आणि कार्यक्षेत्रात हा घोटाळा झाला याचे सगळी मुळे बाहेर निघतील. यातील काही अधिकारी निवृत्त झाले असले तरी त्यांनाही याचा जबाब द्यावा लागणार आहे.




### मुख्याधिकारी पत्र देऊन मोकळ्या झाल्या ; पण कारवाई कोण करणार ?

सुमारे दोन महिन्यापूर्वी तक्रारदाराने तक्रार दाखल केली. यामध्ये सगळे मूळ पुरावे जोडण्यात आले. नगरपालिका मुख्याधिकारी यांच्यासह जिल्हा प्रशासन यांच्याकडे तक्रार केली गेली. त्यानुसार नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांनी एक पत्र संबंधितांना पाठवून, हा प्रकार बोगस असल्याचे कबूल केले. मात्र नुसते कबूल करून चालणार आहे का ? नगरपालिका चे संपूर्ण प्रशासन त्यांच्या हातात असल्याने, त्यांनी या प्रकरणांमध्ये अडकलेल्या प्रत्येकांवर कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र त्या केवळ पत्र देऊन रिकाम्या झाल्या, पण कारवाई कोण करणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### पुराव्यासह तक्रार देऊनही प्रशासन गप्प का ?

एप्रिल महिन्यामध्ये प्रशासनाकडे याबाबतची अधिकृत तक्रार करण्यात आली आणि सोबत पुरावे सुद्धा देण्यात आले. मात्र तक्रारीला दोन महिने उलटून गेले तरी जिल्हा प्रशासनाकडून याबाबत कुठलीही कार्यवाही झाली नाही. प्रशासनाकडे तक्रार जाऊनही कार्यवाही होत नसेल तर या मागचे गौडबंगाल नेमके काय आहे ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. नागरिकांच्या तक्रारी जर दोन दोन महिने लक्षात घेतल्या जात नसतील, त्यावर कार्यवाही होत नसेल आणि कसलेच उत्तर दिले जात नसेल तर हा गंभीर प्रकार आहे.

# चाकरवाडीत वारकर्यांचा कुंभमेळा आणि भक्तीचा संगम - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

नेकनूर (प्रतिनिधी)

विसाव्या शतकातील संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पंचविसाव्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथी निमित्त भक्तीचा सागर आणि कुंभमेळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. केवळ सेवाभाव असल्याने इथे भाविकांची मांदियाळी जमली असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले तर भवसागर तरुण जाण्याचे तंत्र माऊली दादांनी जगाला दिले. माऊली दादांनी कधीच भेदभाव केला नाही. माऊलींची सेवा करण्याचं भाग्य प्रदीप मिश्रा यांना लाभले असे प्रतिपादन ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांनी केले. माऊली दादा यांच्या पुण्यतिथी निमित्त गुलालाचे किर्तन करताना ते बोलत होते.

यावेळी प्रमुख उपस्थितीत महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, महंत महादेव महाराज चाकरवाडीकर, ह.भ.प.नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, ह.भ.प.रामभाऊ महाराज काजळे, ह.भ.प.नाना महाराज कदम, ह.भ.प.सुरेश महाराज जाधव, ह.भ.प.विठ्ठल महाराज आंधळे, शिवानंद महाराज गिरी, दिनकर कदम, अरुण डाके, विलास बडगे, गंगाधर घुमरे, सखाराम मस्के, तानाजी कदम, नवनाथ कुलकर्णी, अरुण बोगांणे, नानासाहेब काकडे पाटील यांच्यासह लाखो भावीक भक्तांची उपस्थिती होती.

बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभुती ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या रोप्य महोत्सवी पुण्यतिथीनिमित्त माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांच्या हस्ते माऊलीच्या समाधीची आरती करण्यात आली तसेच प्रसिद्ध शिवकथाकार प्रदीप मिश्रा यांचे स्वागत करून माजी मंत्री क्षीरसागर यांनी आशिर्वाद घेतले. कीर्तन प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, संत माऊलीच्या पुण्यतिथीला दर वर्षी भक्तांचा मोठा संगम याठिकाणी पहायला मिळतो. यावर्षी तर कुंभमेळ्याचे स्वरूप दिसू लागले आहे. लाखो भाविक कथा श्रवणासाठी इथे आले रामायणाचार्य रामराव ढोक महाराज २५ वर्षांपासून अखंडितपणे सेवा करत आहेत. सुरताल आणि भक्तीचा महापूर लोटला आहे. श्रीक्षेत्र चाकरवाडीला पंढरीच्या वाळवंटाचे स्वरूप आले आहे. माऊली बालाघाटाचे आध्यात्मिक वैभव आहे. माऊलींनी सोपा मार्ग सांगितला, अंधश्रध्दे पासून दूर करण्याचं काम माऊलीदादांनी केले आहे.



जात ना पुछो साधूकी! देखो उसका ग्यान.असा दोहा सांगितला ते म्हणाले की, इथे अनेक त्रासातून आणि संकटातून मुक्त होणारे भाविक येतात, वारकरी संप्रदाय हा फक्त भक्तीच्या मार्गावर चालतो हे माऊली प्रत्येकवेळी सांगत असत. त्यामुळे इथे प्रत्येक जातीधर्माचा भाविक जोडला गेला आहे. महिन्याची वारी करणारे हजारो भाविक आहेत. इथे सेवेकर्याची प्रथा खूप मोठी आहे असे सांगून त्यांनी माऊलीच्या चरणी अभिवादन केले. यावेळी उत्सवात गुलालाचे कीर्तन करताना रामराव महाराज ढोक यांनी संत सेना महाराज यांच्या उदार तुम्ही संत। मायबाप कृपावंत ।।१।। या अभंगावर सुंदर चिंतन मांडले यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, श्री क्षेत्र चाकरवाडीत आज भव्य दिव्य सोहळा होत आहे. सुंदर ऐश्वर्य संपन्न सोहळा होत आहे. पुण्य करणार्याची पुण्यतिथी होते. परोपकार, पुण्य आणि पाप दुसर्याला पिडा करणे आहे. माऊली दादा यांनी जगाला भवसागर तरुण जाण्याचे तंत्र दिले असे महाराज म्हणाले. यावेळी साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंग वादक राम महाराज काजळे, गायनाचार्य संतोष महाराज सुंबळे, अभिमान महाराज ढाकणे, भारत महाराज मुरकुटे, मुंडे महाराज, माऊली महाराज आवटे, सतीश महाराज जाधव यांच्यासह महाराष्ट्रातील नामांकित गायक वादक मंडळी उपस्थित होते.



## बच्चुभाऊ कडू यांच्या अमरण उपोषणाची शासनाने तात्कळ दखल घ्यावी - जीलानी शेख

पाटोदा (प्रतिनिधी)

दिव्यांग ,शेतकरी बांधवाच्या मुख्य मागण्यासाठी शेतकरी दिव्यांगाचे नेते बच्चुभाऊ कडू हे गेली सहा दिवसापासुन अमरण उपोषणास बसले असुन त्यांची प्रकृती अंत्यत खालवली असुन महाराष्ट्र शासनाने तात्काळ दखल घेऊन त्यांच्या मागण्या मंजुर कराव्यात नसता बीड जिल्हायात सर्व तहसील कार्यालया समोर दिव्यांग बाधव व शेतकरी योग्य प्रकारचे आंदोलन करतील याची नोंद घ्यावी असे प्रसिद्धी पत्रकात दिव्यांग संघर्ष समितीचे नेते जीलानी शेख व शेख आलमभाई यांनी म्हटले आहे .माजी आमदार बच्चू कडू हे शेतकरी , दिव्यांग यांच्या मागणीसाठी गेली सहा दिवसापासून आमरण उपोषण करत आहेत त्यांची प्रकृती अत्यंत खालवली आहे त्यांच्या जीवितास काही धोका निर्माण झाला आहे याची महाराष्ट्र शासनाने दखल घ्यावी व त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात नसता बीड जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधव रस्ता रोको किवा तहसील कार्यालाया समोर आंदोलन करतील यांची नोंद घ्यावी असे प्रसिद्धी पत्रकात दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र चे जीलानी शेख , शेख आलमभाई ,अशोक दगडखैर ,वैभव देशमुख ,संतोषकुमार राख , ईश्वर आमटे , बजरंग लांडगे , शेख नदीम , शेख मतीन , ईश्वर माने , संतोष गुंजाळ , हनुमंत काळुशे , इत्यादी दिव्यांग बांधवानी म्हटले आहे .



आज मुंबई येथील मुक्तागिरी बंगला येथे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेबांची भेट घेऊन ऑपरेशन सिंदूर ची माहिती जगभर व्यवस्थित मांडणी करून आल्याबद्दल शिवसेनेच्या वतीने त्यांचा सत्कार केला व माजलगाव येथील बाळासाहेब भवनच्या नावाने असलेली साहेबांकडे सुपूर्द केली. यावेळी शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष माननीय सईद भैया खान व माजलगाव शिवसेना शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके उपस्थित होते.

# फसव्या घोषणा करुन सत्तेवर बसलेल्या महायुतीच्या सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत त्यांची जागा दाखवा तालुकाप्रमुख गोरख सिंघन

पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत साहेब,संपर्क नेते सुनिल प्रभु साहेब,विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब व जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड जिल्हा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व बीडचे तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , वडवणीचे तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे ,धारुरचे तालुकाप्रमुख बाबा सराफ ,व माजलगावचे विधानसभा प्रमुख नामदेव सोजे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र शासनाने केलेल्या फसव्या घोषणांच्या विरोधात बीड शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात भव्य चक्का जाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे साठे चौक परिसरात वाहनांच्या भल्या मोठ्या रांगा लागल्या होत्या, शिवसैनिकांचा जुना व साहेबांच्या काळातील जल्लोष बघायला मिळत होता , शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो,या घोषणाबाज सरकारच करायचय काय खाली मुंडके वर पाय , शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाचा विजय असो , महाराष्ट्र शासन हाय हाय ,अशा नावाचे फलक शिवसैनिकांच्या हातात सर्वत्र दिसत होते, तसेच मोठमोठ्या भगव्या झेंड्यानी वातावरण फुलून गेले होते. जुन्या काळातील शिवसेना पुन्हा आज बघायला मिळाली यावेळी तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन




म्हणाले की , महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारने निवडणुकीत शेतकऱ्यांना कर्जमुक्त करु , लाडक्या बहिणीला २१०० रु.देऊ ,४५ हजार गावात पांदन रस्ते करु , शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील जी.एस .टी. अनुदानाच्या स्वरुपात कमी करु ,१ रुपायात पिकविमा काढू , वयस्कर पेनशन धारकांना २१०० रु देऊ . अन्नदाता बनेल ऊर्जा दाता , शेतीला २४ तास वीज, शेतीमालाला हमीभाव देवू ,हर घर जल ,हर घर छत ,अशा फसव्या व शक्य नसलेल्या योजनेची लालच दाखवून मते घेतली व सरकार स्थापन केले पण सत्ता हातात आल्यावर या सर्व योजना गुंडाळून आता लाडक्या बहिणींची तपासणी चालू केली आहे हा हि निव्वळ फसवणूक आहे असे सिंचन अण्णा यांनी सांगितले , तसेच जाहीर केलेल्या घोषणांची अंमलबजावणी न केल्यास यापुढे उद्धव साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार तीव्र आंदोलन करण्याचा येईल असा इशारा शासनाला दिला.या चक्का जाम आंदोलनाला उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके,तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन बीड , तालुकाप्रमुख विनायक बप्पा , धारुरचे तालुकाप्रमुख बाबा सराफ ,जिल्हासहसचिव श्रीकृष्ण गायके ,युवराज मामा शिंदे,वडवणी मुळे , माजलगावचे विधानसभाप्रमुख नामदेव सोजे पाटील, धारुरचे तालुकाप्रमुख बाबा सराफ , युवासेनेचे बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले , वडवणीचे युवासेनेचे तालुका युवाअधिकारी नवनाथ मोरे ,बीड तालुका सचिव नंदु येवले, सहसचिव संदिप भानप ,माजी तालुकाप्रमुख विनायक ढगे , उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव , उपतालुकाप्रमुख अशोक गोंडे , युवा नेते मुकेश घुमरे,सर्कल प्रमुख अशोक खांडे , सर्कल प्रमुख नारायण तौर , सरपंच बाळासाहेब कुटे , सरपंच संजय धपाटे, युवा नेते ज्ञानेश्वर सिंघन , माजी सरपंच सखाराम मोहिते , चेअरमन मुन्ना पवार ,पाली सर्कल मधील कोल्हारवाडीचे शाखाप्रमुख राजेंद्र भोसले,इमामपुरचे शाखाप्रमुख सुनिल कदम ,वायबटवाडीचे शाखाप्रमुख गणेश वायबट ,धनगर वाडीचे शाखाप्रमुख परमेश्वर भावले , मोची पिंपळगावचे शाखाप्रमुख नितेश आखाडे, करझणीचे शाखाप्रमुख अन्साराम जगताप ,समनापुरचे शाखाप्रमुख नारायण गोरे , दत्ता चोरमले, प्रल्हाद रांजवण, अशोक जाधव ,पदवी भोसले ,उमेश घललाळ, नितीन घललाळ, हनुमान घललाळ , युवानेते भरत खरात ,

# साक्षाळ पिंपरी ते नारायणगड जुना रस्ता झाला खुला : शेतकरी आणि भाविकांनी तहसीलदार शेळके यांचे मानले आभार

## अनेक वर्षापासून चा प्रश्न मिटल्याने बळीराजा सुखावला

महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताची निर्णय घेतले आहेत . बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना नियमानुसार नागरिकांची शेतकऱ्यांची कामे तात्काळ करणे बाबतची निर्देश दिलेले आहेत .

नव्यानेच पदभार घेतलेले विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी बुधवारी विभागातील सर्व जिल्हाधिकारी , अपर जिल्हाधिकारी यांची बैठक घेऊन सर्वसामान्य शेतकरी नागरिक यांची कामे तातडीने करण्याबाबत सूचना केल्या . बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जनता दरबार घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे . ३० मे रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी साक्षाळ पिंपरी गावात भेट दिली होती . यावेळेस त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर अभियानात विविध प्रमाणपत्रांचे वाटप करून शेतकऱ्यांनी त्यांच्या अडचणी बिनदिक्कतपणे सांगाव्या असे आवाहन केले होते . बीड जिल्ह्यात प्रशासन लोकोपयोगी कार्ये इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून येत आहे .

निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावी अशी सांगत असतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव ह्या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत . गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये , असा त्यांचा कटाक्ष असतो .

साक्षाळपिंपरी ते नारायणगड हा सुमारे ७० ते ७५ वर्षांपूर्वीचा जुना रस्ता गेली चार वर्ष पासून बंद होता . सदरचा रस्ता खुला करण्यासाठी मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके , ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप यांनी वारंवार प्रयत्न केला . परंतु त्यांना त्यामध्ये यश आले नाही . त्यामुळे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी गुरुवारी या ठिकाणास भेट दिली . त्यांच्या पुढाकाराने साक्षाळ पिंपरी ते नारायणगड हा सुमारे तीन किलोमीटर लांबीचा रस्ता खुला झाला . हा रस्ता गट नंबर ५७२ मध्ये अडवलेला होता . अंदाजे पाचशे मीटर रस्ता हा अत्यंत



अरुंद होता . या ठिकाणी खोल पानंद असल्यामुळे चिखल होत होता . त्यामुळे शेतकऱ्यांना , भाविक , विद्यार्थी याना रस्त्याचा वापरच करता येत नव्हता . गावातील शेतकरी तसेच शेतमजूर , गावातील शेतकरी यांना शेतात शेतीविषयक अवजारे खते बी बियाणे नेण्यासाठी खूप मोठी अडचण निर्माण झालेली होती .

गावातील शेतकऱ्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना भेटून सदर रस्त्याची हकीकत सांगितली होती . हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असल्याने आणि सुमारे पाचशे शेतकऱ्यांसाठी सुद्धा हा रस्ता आवश्यक असल्याची खात्री पटल्यामुळे तहसीलदारांनी या ठिकाणी स्वतः भेट देण्याचे ठरविले . गुरुवार १२ जून रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अडवलेला पाचशे मीटर रस्ता ज्या शेतकऱ्यांनी अडवला आहे , त्यांना समक्ष जागेवर बोलावून गावकऱ्यासमोर समजावून सांगितले .

मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके यांनी शेतीसाठी रस्ता हा अत्यंत महत्त्वाचा असतो , शेतकऱ्यांच्या दळणवळणासाठी आणि एकंदरीतच विकासासाठी रस्ते होणे किती महत्त्वाचे आहे हे यावेळी समजावून सांगितले . शेतकरी , शाळेत जाणारे विद्यार्थी यांना जर असे चिखला पाण्यातून जावे लागत असेल तर यासारखी शरमेची बाब आपल्यासाठी असू शकत नाही , हे त्यांनी सर्वांना पटवून दिले .

त्यानंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सामोपचोराने ग्रामपंचायतचे कर्मचारी यांच्या मदतीने रस्त्याच्या खुणा करून मार्किंग करून दिली . हा रस्ता खुला करून देण्यात आला . दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांनी सुद्धा प्रशासनाला सहकार्य करत आम्ही तात्काळ जेसीबीच्या साह्याने रस्त्याच्या दोन्ही बाजूस नाल्या करून जास्तीत जास्त रस्ता उंच करू , जेणेकरून येथे पुन्हा चिखल होऊ देणार नाही अशी हमी दिली .

सदरचा रस्ता खुला केल्याबद्दल गावचे सरपंच सौरभ नलावडे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे गावच्यावतीने आभार मानले . सदरचा रस्ता खुल्या केल्यामुळे या रस्त्याने सुमारे ५०० शेतकऱ्यांची ये जा करण्याचा मार्ग खुला झाला आहे . हा रस्ता बंद असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांची शेतीविषयक कामे तसेच शेतात खते बी बियाणे अवजारे जनावरे महिला पुरुष यांना पूर्वी तीन किलोमीटर दूरुन जावे लागत होते . रस्ता खुला झाल्यामुळे हे अंतर वाचणार आहे व परिश्रम वाचणार आहेत . हा रस्ता खुला करतेवेळी गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते . त्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे जागेवर येऊन गेली चार वर्षे बंद असलेला रस्ता खुला केल्याबद्दल महसूल प्रशासनाचे आभार मानले .

हा रस्ता खुला करतेवेळी पारगाव सिरसच्या मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके , तलाठी यशवंत सानप , ग्रामसेवक भास्कर भस्मारे , सरपंच सौरभ नलावडे , उपसरपंच पार्वती काशीद , माजी जिल्हा परिषद सदस्य नारायण काशीद , संपत काशीद , सखाराम काशीद , विक्रम काशीद , लक्ष्मण काशीद , अर्जुन काशीद , बाबुराव काशीद , बापूराव काशीद , प्रकाश काशीद , भागवत काशीद , नारायण सुपेकर , बाळू काशीद विकास काशीद , गणेश काशीद उपस्थित होते .



## सुशिक्षित बेरोजगारांच्या मदतीसाठी धावून येणारी महिला

बिलाल कुरेशी

शिराढोण येथील सामाजिक कार्यकर्त्या शाहीदा जहागिरदार यांनी २०१५ ते २०१९ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे अंतर्गत समाजातील वंचित उपेक्षित घटकापर्यंत सामाजिक न्याय व विशेष साह्य विभागाच्या योजना वाडी,वस्ती,गावात जाऊन पोहचवल्या महिला सक्षमीकरणाचे कार्य केले.

कोरोना काळात काम बंद पडले. तिथंच न धांबता आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट अंतर्गत स्वयंसेवक म्हणून मानसिक आरोग्य आणि मानसिक आजार या विषयावर कळंब विविध तालुक्यातील शाळांमध्ये, महाविद्यालयांनमध्ये चर्चा सत्रे घेतली. त्यांच्या कामाची दखल घेऊन प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन चे धाराशिव जिल्हा समन्वयक माननीय सदाशिव साबळे सर यांनी इस. २०२४-२५ मध्ये त्यांची नियुक्ती कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत मार्गदर्शक म्हणून केली.कळंब तालुक्यातील विविध गावांमध्ये जाऊन,महाविद्यालयांमध्ये चर्चा सत्रे,रोजगार मेळावे घेऊन तब्बल दीडशे युवक ,युवतींना प्रशिक्षण देऊन नोकरी आणि स्वयंरोजगार साठी त्यांनी मार्गदर्शन केले.

सध्या त्या प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन लातूर कौशल्य विकास कार्यक्रम केंद्र प्रमुख माननीय संतोष गुंजोटे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतात. युवकांना प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवतात आणि सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम देऊन बेरोजगारी दूर करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.त्यांना त्यांच्या कामासाठी आणि पुढील वाटचाली साठी

# ज्योतीताई आयटीआय ला भेट देऊन पाहणी करणार; बातमीची घेतली दखल!

## बातमी प्रसिद्ध करणाऱ्या सर्व वृत्तपत्रांचे आभार - एस.एम.युसूफ़

बीड (प्रतिनिधी)

शहरात असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्थातच आयटीआय ची झालेली दुरावस्था, ३१४० जागा असूनही फक्त २५०० विद्यार्थ्यांचे आलेले अर्ज, अनेक ट्रेड्सला विद्यार्थी मिळत नसल्याने इन्स्ट्रक्टरांना विद्यार्थी मिळविण्यासाठी घरोघरी-दारोदारी भटकण्याची आलेली वेळ, विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान पाहता याविषयी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी ज्योतीताई विनायकराव मेटे यांना उद्देशून 'ज्योतीताई, मेटे साहेबांच्या नावाखातर तरी आयटीआय कडे लक्ष द्या; विद्यार्थी आणि पालक फिरवताहेत पाठ' या शीर्षकाने प्रसिद्धी माध्यमातून बातमी दिली होती. बीड शहरातील आयटीआयला दिवंगत नेते विनायकरावजी मेटे यांचे नाव देण्यात आले आहे. त्यांचे नाव असलेल्या या आयटीआयची अशी अवस्था बातमीतून विशद केल्यानंतर याची दखल घेत ज्योतीताई लवकरच बीडला येऊन





आयटीआयची पाहणी करणार असल्याचे त्यांनी भ्रमणध्वनीवरून बोलताना सांगितल्याची माहिती एस.एम.युसूफ़ यांनी दिली आहे.याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, प्रसिद्धी माध्यमातून बातमी येताच दस्तूरखुद्द ज्योतीताईंनी याची नोंद घेतली आणि भ्रमणध्वनी वरून बोलताना आयटीआय बद्दल सखोल माहिती घेतली. यावेळी आयटीआयची झालेली दुरावस्था, प्रत्येक ट्रेड्सच्या विभागाला आलेली अवकळा, कोणत्याच विभागात विद्यार्थ्यांना बसण्यासाठी नीटनेटके बाकडे, टेबल किंवा डेस्क व्यवस्थित नाहीत. पिण्याच्या पाण्याचे सर्व फिल्टर प्लांट बंद आहेत. साधे पाणी सुद्धा पिण्यास उपलब्ध नाही. आयटीआय अंतर्गत असलेले सर्व रस्ते डोंगरदर्यासारखे झालेले आहेत. सध्या पावसाळा सुरू असल्याने संपूर्ण रस्ते चिखलाने माखलेले आहेत. अशा अवस्थेत येथे शिक्षण घेण्यास येणाऱ्या जिल्हाभरातील विद्यार्थ्यांना मोठ्या हाल अपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. यावर कहर म्हणजे एकही ट्रेड्सचे इन्स्ट्रक्टर आठवड्यातील सहा दिवस उपस्थित राहत नाहीत. अनेक इन्स्ट्रक्टर आळीपाळीने दांडी यात्रेवर असतात. प्राचार्यांची सुद्धा अशीच अवस्था आहे. प्राचार्य स्वतःच दांडी यात्रेवर असल्याने त्यांचा इन्स्ट्रक्टरांवर अंकुश नाही. इन्स्ट्रक्टर नियमित येत नाहीत म्हणून अनेक विद्यार्थी ही अनुपस्थित असतात. अशा एक ना अनेक बाबी भ्रमणध्वनी वरून बोलताना एस.एम.युसूफ़ यांनी ज्योतीताई मेटे यांच्या कानी घातल्या. या सर्व बाबी ऐकून त्यांनी बीडला आल्याबरोबर आयटीआय ला भेट देऊन पाहणी करणार असल्याचे सांगितल्याची माहिती मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिली असून याविषयी ठळक बातमी प्रसिद्ध करणाऱ्या सर्व वृत्तपत्रांचे आभार व्यक्त केले

## श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड संस्थानात मानाचे शुभ्र अश्व अर्पण सोहळा थाटात पार पडला

माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वतीने अश्व अर्पण; परमपूज्य विठ्ठल महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत धार्मिक विधी संपन्न

पाटोदा (फयाज सय्यद)

पाटोदा तालुक्यातील प्रसिद्ध व श्रद्धास्थान असलेल्या श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड संस्थान येथे एका विशेष धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वतीने गड संस्थानास मानाचे दोन पांढरे शुभ्र अश्व अर्पण करण्यात आले. या अश्वांचे परमपूज्य ह.भ.प. श्री विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत विधीवत पूजन व स्वागत करण्यात आले.



संपूर्ण कार्यक्रम दरम्यान मंत्रोच्चार, भजन, कीर्तन व पारंपरिक वाद्यांच्या गजरात भाविकांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. या पूजेसाठी विविध भागांतून आलेले शेकडो भक्तगण, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते डॉ. अजय दादा धोंडे, जि.प. सदस्य रामराव खेडकर, रामदास बडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, माजी सभापती अनिल जायभाये,डिगाबर नाईकनवरे तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.घोड्यांचे स्वागत व अर्पण विधी गड संस्थानाच्या अध्यात्मिक सेवेसाठी एक ऐतिहासिक घटना ठरली असून, गड परिसरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. भाविकांनी या सोहळ्याचे कौतुक करत माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या योगदानाची विशेष दखल घेतली.

## शाळा सुरू होण्यापूर्वी स्कूल वाहनांच्या फिटनेसवर प्रश्नचिन्ह; पालकांना सतर्कतेचे आवाहन :- नितीन सोनवणे

बीड (प्रतिनिधी)

दि. १२ जून २०२५: येत्या १६ जून २०२५ पासून राज्यभरातील शाळा पुन्हा सुरू होत असताना, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून स्कूल बस आणि व्हॅनच्या फिटनेस सर्टिफिकेटची तपासणी करण्याचे आवाहन पालकांना करण्यात आले आहे. बीडमधील नितीन सोनवणे ऑल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते तथा जिल्हाध्यक्ष बीड या सामाजिक कार्यकर्त्यांनी यासंदर्भात आवाज उठवला असून, जुन्या आणि खराब झालेल्या वाहनांना शाळांसाठी परवानगी देऊ नये, सोनवणे यांनी अशी मागणी बीड ठढज कडे केली आहे.

पालकांना उद्देशून एका निवेदनात म्हटले आहे की, आपल्या मुलांच्या सुरक्षित प्रवासासाठी स्कूल वाहनांची योग्य देखभाल आणि वैध फिटनेस प्रमाणपत्र असल्याची खात्री करा. जुन्या वाहनांमुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. यासंदर्भात बीड ठढज ने कठोर नियम लागू करावेत आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, ऑल इंडिया पँथर सेना बीड च्या वतीने अशी मागणीही



करण्यात आली आहे. अपघात किंवा कोणतीही हानी झाल्यास याची जबाबदारी बीड ठढज ची असेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

पालकांची भूमिका महत्त्वाची

शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर पालकांनी स्वतःहून स्कूल बस किंवा व्हॅनच्या कागदपत्रांची पडताळणी करणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित आणि निर्धास्त होईल, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. बीड ठढज कडून याबाबत कोणती पावले उचलली जाणार, याकडे बीड जिल्ह्यात या गोष्टीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सकारात्मक विचाराने पुढे गेल्यास यश तुमचेच-प्रा. डॉ.मकबूल बरोटे





औसा

शिक्षण क्षेत्रात केवळ पारंपरिक शाखांसाठी प्रयत्न न करता आधुनिक आणि नव नवीन शाखांत प्रवेश घेऊन आपले भविष्य उज्वल करावे असे आवाहन आझाद महाविद्यालय औसा चे प्रा. डॉ. मकबूल बरोटे यांनी सांगितले.ते औसा येथील महदविया यंग सर्कल मार्फत आयोजित दहावी, बारावी व वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी महदवी समाजाचे ज्येष्ठ अब्दुल गनी करपुडे होते.प्रमुख पाहुणे म्हणून लातूर चे कवी अब्दुल गफार मुंगले उपस्थित होते. अब्दुल गफार मुंगले यांनी सांगितले की, विद्यार्थांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे,अभ्यासात टेक्निक्स चे वापर करावे.यश हे वेळ आणि कौशल्याच्या आधीन आहे.असे सांगितले.

समाजा मार्फत विद्यार्थ्यांचे कौतुक आणि सन्मान हे त्यांच्या भविष्यातील प्रेरणादायी क्षण असतो म्हणून महदविया यंग सर्कल औसा आणि उमर भाई पंजेशा यांचे कार्य हे कौतुकास्पद आहे. उमर भाई पंजेशा व त्यांचे मित्र हे निस्वार्थ भावनेने सामाजिक कार्य करीत आहेत.ज्या समाजात अशा तरुणांचा समावेश आहे तो समाज निश्चितच अग्रेसर राहतो.असे विचार ज्येष्ठ पत्रकार मोहम्मद मुस्लिम कबीर यांनी व्यक्त केले. महदविया यंग सर्कल चे सचिव उमर भाई पंजेशा यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील यशस्वी विद्यार्थांचे कौतुक करून त्यांना पाठबळ देण्याचे काम या संघटने मार्फत करण्यात येत आहे.यामुळे समाजातील विद्यार्थ्यांमध्ये विश्वास वाढला आहे. यावेळी भारत सरकार मार्फत नोटरी म्हणून नियुक्त झाल्या बद्दल ड. मकबूल हुसेन अलुरे यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन आरेफ मन्यारी यांनी केले तर आभार ड. वसीम करपुडे यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या वेळी व्यासपीठावर प्रा. अब्दुल वहाब मल्लेभारी,कवी जिलानी मुल्ला,डॉ. गौसपाशा तत्तापूरे, इमाम कासीम करपुडे, जब्बार करपुडे, आदि उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्या साठी जिलानी हिप्परगे,जिलानी करपुडे,मुबिन करपुडे,इब्राहिम तत्तापूरे,मैनुद्दीन करपुडे,यासीन करपुडे,जावेद मुल्ला, कामरान हावरे,अमन करपुडे, खुंदमिर अलूरे, नियामत लोहारे,फारुक करपुडे,इरफान बरोटे, जाफर कुमारकिरी, अल्ताफ करपुडे आदिनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक शेख बिलाल शेख युसुफ यांनी आर.एम. प्रिंटर्स, बार्शी रोड बीड - ४३११२२ येथे छापून सायं.दैनिक विश्वनायक कार्यालय, खासबाग खाजानगर देवी रोड, बीड ता.बीड जिल्हा बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशितकेले आहे.संपादक शेख बिलाल शेख युसुफ मो.८६८६८८८८९८ Email : vishvanayak94@gmail.com